REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# भ्रष्टाचाराची कारणे, परिणाम व उपाययोजना

प्रा. डॉ. नरेंद्र श्रीधर बागडे
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग ,
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड, नागपूर.

## प्रस्तावना

भारतीय समाजामध्ये बेरोजगारी, गरिबी, आर्थिक विषमता, या समस्येप्रमाणेच भ्रष्टाचार या समस्येने उग्र स्वरुप धारण केले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आर्थिक नियोजनाला सुरुवात केली, नवनवीन योजना राबविण्यास प्रारंभ झालाव उत्पादनामध्ये वाढ व्हायला सुरुवात झाली परंतु या सर्व सुधारणा होत असतांना त्यामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले त्यातीलच एक भ्रष्टाचार होय. ही समस्या भारतातील सर्व राज्यामध्ये सर्व विभागामध्ये कमी अधिक प्रमाणात आढळून येते. सामाजिक आणि नैतिक नियंत्रणाच्या शिथिलतेमुळे भ्रष्टाचाराचा रोग प्रत्येक क्षेत्रात आढळून येतो. जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, शासकीय इत्यादी सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार दिसून येतो. गृहखाते, अर्थखाते, शिक्षण खाते, उद्योग खाते, संरक्षण खाते, परराष्ट्र खाते, समाज कल्याण खाते असे कितीतरी विभाग आहेत की ज्यात दररोज कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार सुरु आहे. यामुळे देशाचा आर्थिक विकास खुंटतो, लोकांच्या उत्पन्नामध्ये वाढ होत नाही, दरदोई उत्पन्न कमी राहते व देशाचा आंतराराष्ट्रीय पातळीवर पत कमी होते. एखाद्या व्यक्तीला आदर्श माणूस म्हणून राजकीय नेते व वरीष्ठ अधिकारी यांच्याकडे पाहण्याची वेळ संपत आली आहे. कोणाचे चारित्र्य भ्रष्टाचाराशिवाय शुद्ध असेल असे ठामपणे सांगता येत नाही. आजच्या काळामध्ये प्रत्येक काम लाच दिल्याशिवाय होत नाही. त्यामुळे लाच देणे व घेणे हा व्यवस्थेचा एक हिस्सा होवून बसला व भ्रष्टाचाराला मान्यता मिळत गेली.

स्माजाचा समतोल विकास करण्यासाठी, मागे राहीलेल्या लोकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सरकारकडून सामाजिक विकासाच्या विविध योजना राबविल्या जातात. या योजनांचे खरे लाभार्थी जे असायला पाहिजेत, जसे कनिष्ठ स्तरातील भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक, दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणारे लोक, जंगलात जीवन व्यथित करणारे आदिवासी इत्यादी, परंतु त्यांच्यापर्यंत फारच कमी प्रमाणात योजना पोहचतात. भ्रष्टाचारामुळे काही योजना फक्त कागदोपत्रीच लाभार्थ्यापर्यंत पोहचतात यामुळे लोकांच्या जीवनमानात काहीच सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

## संशोधनाचे उद्दिष्ट्ये

१) भारतातील भ्रष्टाचाराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) भारतातील भ्रष्टाचारास प्रवृत्त असणाऱ्या कारणांचा शोध घेणे.
३) भारतातील भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

## भ्रष्टाचाराची व्याख्या



**भार्गव यांच्या मते,** "स्वत: किंवा त्याचे कुटुंब किंवा मित्रासाठी सार्वजनिक सेवकाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपण आर्थिक किंवा भौतिक लाभासाठी एखादे कृत्ये करणे अथवा न करणे म्हणजे भ्रष्टाचार होय."

## भ्रष्टाचार आणि स्विस बँक

भारत देश गरीब आहे परंतु भारत कधीच गरीब नव्हता, भारत हा गरीब लोकांचा श्रीमंत देश आहे. भारतातील जनतेची विदेशामध्ये भरपूर संपत्ती आहे. स्विस बँकेच्या अधिकाऱ्याचे असे मत आहे की,

भारतातील जवळपास २८०लाख करोड रुपये स्विस बँकेमध्ये जमा आहेत. ही रक्कम एवढी आहे की येणाऱ्या ३० वर्षामध्ये भारताने टॅक्स नाही घेतला तरी भारताला काही फरक पडत नाही. सन २०१५ मध्ये भारताचा भ्रष्ट्राचाराचा निर्देशांक ७६ होता जो या अगोदरच्या वर्षापेक्षा चांगला आहे. सन २०१४ मध्ये हा निर्देशांत ८५ तर २०१२ मध्ये ९४ होता.

## भ्रष्ट्राचाराची कारणे

भ्रष्ट्राचार ही जागतिक स्वरुपाची समस्या झाली असून व्यक्तीची संपत्ती मिळविण्याची लालसा हे भ्रष्ट्राचाराचे सार्वत्रिक कारण आहे. प्राचीन काळामध्ये समाजात पैशाला जास्त महत्व दिल्या जात नव्हते व स्थानिक पातळीवरच मानवाच्या गरजांची पूर्तता होत असे. परंतु बदलत्या काळानुसार मानसाच्या गरजा बदलत गेल्या व मानवाला अधिक पैशाची गरज भासु लागली. वेगवेगळ्या गरजा वाढल्यामुळे मानुस वेगवेगळ्या कारणांनी भ्रष्ट्राचार वाढवत गेला ती कारणे पुढीलप्रमाणे

### १) भौतिकवादी जीवनशैली

आधुनिक काळामध्ये व्यक्तीच्या जीवनशैलीमध्ये फारच फरक दिसून येतो. ती जीवनशैली फारच खर्चिक असल्यामुळे अधिक पैसा खर्च होतो. व तो पैसा मिळविण्याच्या प्रयत्नातुन व्यक्ती भ्रष्ट्राचाराकडे वळत आहे. अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून जागतिक बाजारपेठेमध्ये इतर देशाच्या चलनाच्या तुलनेत भारतीय रुपयाचे अवमूल्यन होत असतांना दुसऱ्या बाजूला भौतिक सुखसोयींनी युक्त ऐषारामाचे जीवन जगण्यासाठी पैशाला महत्व प्राप्त झाले आहे. अशा वेळी पैसा चांगल्या मार्गाने कमाविणे शक्य होत नाही व मिळालाच तर तो पुरत नाही म्हणून भ्रष्ट्राचार करुन जास्तीत जास्त पैसा मिळवून हवे ते भौतिक सुख मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

### २) आर्थिक असुरक्षितात

आज व्यक्तीला ज्या सुविधा मिळतात त्या भविष्यात मिळतील की नाही हे सांगता येत नाही. आर्थिक चिरस्थायी विकास टिकणे कठीण झाले आहे. आपला दर्जा उंच व्हावा, आपण श्रीमंत व्हावे, आज मिळालेली संधी सोंड नये म्हणून गरीब माणूस भ्रष्ट्राचार करतो व आपण गर्भश्रींमत व्हावेत म्हणून श्रींमत माणूस भ्रष्ट्राचार करतो. म्हणजेच आज माणसात कुठेतरी असुरक्षिततेची भावना वाढत जावून माणूसाला आर्थिक असुरक्षितता जाणवत आहे.

### ३) लाचलुचपत प्रतिबंधक खाते अकार्यक्षम

भ्रष्ट्राचाराचे निर्मूलन करण्यासाठी शासनस्तरावर लाचलुचपत प्रतिबंधक खाते स्वतंत्ररित्या कार्यरत आहे. परंतु या खात्याद्वारे सुद्धा कायद्याची योग्य अंमलबजावणी केली जात नाही. या विभागाकडून कार्यवाही करण्याअगोदच संबंधीत भ्रष्ट अधिकारी सावध होतात.

## भ्रष्ट्राचाराचे परिणाम

भारतामध्ये भ्रष्ट्राचाराची समस्या ही खुपच घातक असलेली समस्या आहे व या समस्येमुळे देशाचे फार मोठे नुकसान होत आहे. ही समस्या कर्करोगाप्रमाणे भारताला पोखरुन टाकत आहे. या समस्येचे अत्यंत विघातक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर आहेत आहेत. भ्रष्ट्राचारामुळे देशाचा विकास होत नाही व आर्थिक विकास मंदावतो. देशामध्ये काळ्या पैशाचे प्राबल्य वाढते त्यामुळे अवैध धंदे व आर्थिक विषमता वाढीस लागते. त्यामुळे लोक वाईट कामे करण्यास प्रवृत्त होतात. भ्रष्ट्राचारामधूनच गुन्हेगारी वाढीस लागते त्यामुळे राष्ट्राची हानी होते. खाद्यपदार्थ, औषधे यांच्यामध्ये भेसळ केल्यामुळे लोकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. तसेच बांधकाम क्षेत्रामध्ये पैसे देवून कामे मंजूर करुन घेतल्या जातात व ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामाला उत्तम कामाचे प्रमाणपत्र दिल्या जाते. अशा प्रकाराच्या प्रकारामुळे अनेक पुलाचे काम, रेल्वेचे पुल, तलाव, धरणे, रस्ते यांच्या कामामध्ये निकृष्टपणा असल्यामुळे अनेक पुल कोसळतात. सरकारच्या पैशाचा अपव्यय होतो व लोकांच्या जीवाला हानी पोहचवून जीवीत व वित्त हानी होते.

## भ्रष्टाचार निर्मूलनासाठी उपाययोजना

भारतामध्ये भ्रष्टाचार ही समस्या संपविण्यासाठी किंवा या समस्येची तिव्रता कमी करण्यासाठी काही घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये १९४७ चा भ्रष्टाचार निर्मूलन हा मुख्य कायदा होय. परंतु या कायद्यामध्ये परिपूर्णता नसल्यामुळे नंतरच्या काळात १९५२ मध्ये त्या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. व नंतर सप्टेंबर १९८८ मध्ये भ्रष्टाचार निर्मूलनार्थ दुसरा कायदा करण्यात आला. केंद्र सरकारने भ्रष्टाचारांच्या संदर्भात

अभ्यास करण्यासाठी जून १९६२ मध्ये श्री. के. संथनाम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. संथनाम या समितीने सार्वजनिक क्षेत्र, आयात निर्यात निर्बंध, आयकर, सीमा शुल्क व आबकारी खात्यातील भ्रष्टाचारांचा अभ्यास केला. या समितीने काही सूचना व उपाय सांगीतले. या शिफारशीनुसार केंद्र सरकार आणि इतर कर्मचाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी १९६४ मध्ये केंद्रीय सतर्कता आयोग स्थापन करण्यात आला होता.

## उपाययोजना

### १) कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ

कार्यालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला खूपच कमी पगार असल्यामुळे कर्मचारी भ्रष्टाचार करण्यास पुढे सरसावतो. त्याचा पगार कमी असल्यामुळे त्याच्या मुलभूत गरजा पूर्ण होत नाहीत व यातुनच तो भ्रष्टाचार करतो.

### २) योग्य अधिकाऱ्यांची निवड

गुणवत्ता युक्त, पात्र कार्यक्षम अधिकाऱ्याची नि:पक्षपातीपणे उच्च प्रशासकीय पदावर निवड करण्यात यावी. अधिकाऱ्यांच्या निवडीतच पक्षपात व भ्रष्टाचार झाला व पदभ्रष्ट व्यक्ती अधिकाऱ्याच्या पदावर आरुढ असेल तर भ्रष्टाचार निर्मूलनाची अपेक्षा करता येणार नाही.

### ३) कायद्याची योग्य अंमलबजावणी

भ्रष्टाचारासारख्या समस्येवर उपाय करावयाचा असेल तर कायद्याची योग्य अंमलबजावणी व्हायला हवी. जो व्यक्ती गुन्हेगार आहे त्यावर ताबडतोब कारवाई करावी व त्याला शिक्षेची मागणी करावी. यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक व भ्रष्टाचार निर्मूलन कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात आली पाहीजे.

### ४) समाजामध्ये जागृती

भ्रष्टाचार या समाजविघातक समस्येवर सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे स्वत: समाजाने या समस्येविषयी जागृत राहणे गरजेचे आहे. व्यक्तीने जर मी भ्रष्टाचार करणार नाही व करु देणार नाही असे ठाम केले तर ही समस्या संपूर्णत: नष्ट होईल.

## संदर्भ .

१. कऱ्हाडे बी. एम. 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०१०.
२. मायी सुनील, 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००९.
३. कुलकर्णी बी.डी., ढमढरे एस.व्ही., 'अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती', डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर, २००७.
४. बोधनकर सुधीर, अलोणी विवके, कुळकर्णी मृणाल, 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१४.
५. बोधनकर सुधीर, चव्हाण साहेबराव, 'श्रम अर्थशास्त्र', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८.
६. रोडे विजयकुमार,' आर्थिक विकास : एक चिंतन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.